# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग,

**तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

**दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५६/२२०४०००७ Email ID :** doestttrg.wrd@maharashtra.gov.in

---

**क्रमांक : टिजीओ-२०२३/(प्र.क्र.३३/२०२३)/आ(प्रशि)** **दिनांक :९ सप्टेंबर, २०२४**

**विषय:-** जलसंपदा विभागातील कार्यरत कार्यकारी अभियंता ते सचिव/ कार्यकारी संचालक संवर्गातील अधिका-यांचे सेवाकालावधीतील प्रशिक्षण नॅशनल वॉटर ॲकॅडमी, पुणे येथे आयोजित करणेबाबत.

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टीआरएन-०९/प्र.क्र. ३९/०९/१२-अ , दिनांक २३.०९.२०११

**ज्ञापन:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यात आले असून, त्यानुसार राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरीता सर्व कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आर्थिक, सामाजिक व तांत्रिक बदलांमुळे निर्माण होणा-या आव्हानांना सामोरे जाणे व प्रशासनातील बदलांसाठी आवश्यक असलेली लवचिकता साध्य करण्यासाठी देखील सर्व स्तरावर प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

२. जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता व त्यापेक्षा वरिष्ठ संवर्गातील अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता, सचिव/ कार्यकारी संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवाकालावधीतील प्रशिक्षण खालीलप्रमाणे आयोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | कालावधी (आठवडे) | संस्था |
|---|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता | २ | महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा), नाशिक |
| २) | अधीक्षक अभियंता | २ | केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील नॅशनल वॉटर ॲकॅडमी (NWA), पुणे |
| ३) | मुख्य अभियंता | २ | |
| ४) | सचिव / कार्यकारी संचालक | १ | |

३. राज्य प्रशिक्षण धोरणानुसार सदर प्रशिक्षण कार्यक्रम उपरोक्त संवर्गासाठी बंधनकारक राहील. केंद्र शासनाच्या अभियंत्यांना नॅशनल वॉटर ॲकॅडमी (NWA), पुणे या संस्थेमार्फत NWA या संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. जलसंपदा विभागाने नॅशनल वॉटर ॲकॅडमी, पुणे समवेत करारनामा केला असल्याने केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसमवेत राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आगामी प्रशिक्षणामध्ये करण्यात यावा.

४.	यांप्रित्यर्थ प्रत्यक्ष होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष ३४५१ ०० ००३, प्रशिक्षण (००) (००) (०१) शासकीय कर्मचा-यांना प्रशिक्षण (कार्यक्रम) ५०, इतर खर्च (३४५१२९५१) या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध तरतूदीतून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

(राखी चव्हाण)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत:- १) अपर मुख्य सचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
२) सचिव (लाक्षेवि) जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई .
३) महासंचालक (संप्रजसंसु), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,नाशिक.
४)सर्व कार्यकारी संचालक,पाटबंधारे विकास महामंडळ,जलसंपदा विभाग.
५) सर्व मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग.
६) अधीक्षक अभियंता तथा सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.
७) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
८) सर्व कार्यकारी अभियंता,जलसंपदा विभाग.
९) नॅशनल वॉटर अॅकॅडमी, सिंहगड रोड, खडकवासला, पुणे.
१०)अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
११) आ (प्रशि) कार्यासन संग्रहार्थ.